# आरती श्री गायत्री देवीची

पंचमुखी देवी गायत्री
गाई त्रिभुवन तव भावारती ॥धृ.॥

शुभ्र हंसारूढ तू माता
प्रसवी मूळ गूढ नादा
निर्मी ज्यातूनी या जगता
अती त्या ॐकारा महती
गाई त्रिभुवन तव भावारती ॥१॥

निर्गुण निराकार ब्रह्म
पावूनी त्यासी तादात्म्य
जाण तू मी हे रहस्य
सांगे वेदांची उद्गाती
गाई त्रिभुवन तव भावारती ॥२॥

- नारायण
१२/०९/९६

॥ॐ भूर्भुव: स्व: ।
ॐ तत्सवितुर्वरेण्यं ।
भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ॐ ॥